शनिवार, ८ जानेवारी २०२२
वर्ष १४ अंक १७२
www.ramprahar.com

# राम प्रहर

पाने ६ किंमत ₹२ रायगड

विजेच्या स्वयंपूर्णतेसह स्वच्छ पनवेलच्या दिशेने पाऊल

# महानगरपालिकेच्या सर्वच इमारती सौरऊर्जेने उजळणार

पनवेल : प्रतिनिधी

पनवेल महानगरपालिका मालकीच्या इमारती, नाट्यगृह, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, मलनिस्सारण प्रक्रिया केंद्र व शॉपिंग कॉम्प्लेक्स या ठिकाणी सौरऊर्जा यंत्रणा बसविण्याचा निर्णय शुक्रवारी (दि. ७) झालेल्या पालिका महासभेत घेण्यात आला. त्यामुळे दरमहा होणारा वीजभाराचा तिजोरीवरचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच पनवेल महानगरपालिकेला केंद्र शासनामार्फत फाईव्ह स्टार मानांकन मिळण्यासाठीचा प्रस्ताव देण्यास या महासभेत मंजुरी देण्यात आली. (पान २ वर..)




## विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावर आता १५ जानेवारीला सुनावणी



पनवेल : प्रतिनिधी

कर्नाळा बँकेतील ५२९ कोटी रुपयांहूनही अधिक रकमेच्या बोगस कर्ज प्रकरणामुळे अडचणीत आलेल्या कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी आता १५ जानेवारी २०२२ रोजी होणार आहे. न्यायमूर्ती अनुपस्थित असल्याने ही सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे त्यांचा तळोजा तुरुंगातील मुक्काम आठ दिवसांनी वाढला आहे.

विवेक पाटील यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) १५ जून २०२१ रोजी पनवेलमधील राहत्या घरातून अटक केली होती. त्यांचे वकील अशोक मुदरंगी यांनी ११ ऑक्टोबर २०२१ रोजी त्यांच्या जामिनासाठी अर्ज केला. त्यावर १४ ऑक्टोबरपासून सुनावणी सुरू होती. शुक्रवारी (दि. ७) झालेल्या सुनावणीच्या वेळी सक्तवसुली संचालनालयातर्फे ॲड. गोन्साल्वीस, तर विवेक पाटील यांच्यातर्फे ॲड. ठाकूर हजर होते. या वेळी न्यायालयाने पुढील सुनावणी १५ जानेवारीला करण्याचा निर्णय घेतला.

## भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांचे वाढदिवसानिमित्त आवाहन




**पनवेल :** कोरोनाचे गडद सावट असल्याने आणि ओमायक्रॉनचा वाढता प्रादूर्भाव लक्षात घेता माझ्या हितचिंतकांनी मला प्रत्यक्षात भेटून शुभेच्छा न देता समाजमाध्यमावरून आपल्या भावना व्यक्त कराव्यात, असे आवाहन भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांनी केले आहे.

भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांचा वाढदिवस दरवर्षी कार्यकर्ते, तसेच विविध मान्यवरांकडून उत्साहात साजरा करण्यात येतो. 'शुभेच्छा देण्यासाठी हारतुरे, पुष्पगुच्छ घेऊन प्रत्यक्ष भेटीसाठी येऊ नये. तुमच्या शुभेच्छांबद्दल मला कायमच आदर आहे. आपले प्रेम असेच वृद्धिंगत व्हावे,' असेही वाय. टी. देशमुख म्हणाले.









# आर्थिक आणि आरोग्य स्थितीबाबत राज्य सरकारचा ढिसाळपणा -उपाध्ये

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या आर्थिक आणि आरोग्य स्थितीबाबत राज्य सरकार अजूनही कमालीचा ढिसाळपणा दाखवत असून कोरोनाचा फैलाव महाराष्ट्रात सर्वाधिक वाढत असतानाही केंद्रीय आरोग्य मंत्र्यांनी बोलाविलेल्या बैठकीकडे राज्याच्या आरोग्यमंत्र्यांनी पाठ फिरविली, असा घणाघात भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी शुक्रवारी (दि. ७) पत्रकार परिषदेत केला.



ऊठसूठ केंद्राच्या नावाने बोटे मोडणारे महाराष्ट्रातील ठाकरे सरकार केंद्राचा सहकार्याचा हातदेखील झिडकारत असून स्वयंस्तुतीमध्ये मग्न असलेल्या या सरकारच्या अहंकारापोटी महाराष्ट्राचे मोठे नुकसान होत आहे, असा आरोपही उपाध्ये यांनी या वेळी केला. कोरोना स्थिती हाताळण्यासाठी केंद्राने दिलेल्या निधीपैकी किती निधी खर्च केला याचा हिशोब राज्य सरकारने द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत उपाध्ये बोलत होते. प्रदेश प्रवक्त्या श्वेता शालिनी या वेळी उपस्थित होत्या.

उपाध्ये यांनी सांगितले की, केंद्रीय अर्थसंकल्पाअगोदर देशातील राज्यांच्या गरजांनुसार अर्थसंकल्पात आर्थिक तरतुदी करण्याकरिता राज्यांच्या अर्थमंत्र्यांची बैठक बोलावून चर्चा करण्याची केंद्र सरकारची प्रथा आहे. फेब्रुवारीमध्ये सादर होणाऱ्या अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर ३० डिसेंबर रोजी अशी बैठक आयोजित केली होती. अनेक राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री या बैठकीला उपस्थित होते. बैठकीची रीतसर पूर्वसूचना मिळूनही ठाकरे सरकारच्या अर्थमंत्र्यांनी या बैठकीस जाणे टाळलेच, पण अर्थ राज्यमंत्र्यांनाही बैठकीला न पाठविता निवासी आयुक्त दर्जाच्या एका अधिकाऱ्यास हजेरीपुरते पाठविले गेले. यामुळे आगामी अर्थसंकल्पात महाराष्ट्राकरिता केंद्रीय तिजोरीतून अपेक्षित असलेल्या आर्थिक तरतुदींचा तपशील केंद्रापर्यंत पोहोचू शकलेला नाही. परिणामी आगामी अर्थसंकल्पात राज्याचे नुकसान होण्याची भीती असून, त्यासाठी राज्य सरकारचा निष्काळजीपणा जबाबदार असेल.

महाराष्ट्रातील ठाकरे सरकारकडे कोणतीच स्पष्ट आर्थिक नीती नसल्यामुळेच केंद्र सरकारची सहकार्याची तयारी असूनदेखील केंद्रास पाठविण्याचे प्रस्तावच राज्याकडे तयार नसल्याची चर्चा असून ठाकरे सरकारने या गैरहजेरीबद्दल खुलासा करावयास हवा अशी मागणीही त्यांनी केली. त्या बैठकीस उपस्थित असलेल्या अन्य राज्यांच्या अर्थमंत्र्यांनी व अधिकाऱ्यांनी केंद्रीय अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यासाठी अर्थमंत्र्यांना महत्वाच्या सूचनाही केल्या. ठाकरे सरकारच्या निष्काळजीपणामुळे महाराष्ट्राने मात्र ही संधी गमावली, असा आरोप उपाध्ये यांनी केला.

परिस्थिती हाताळण्यात पूर्ण उदासीन असलेल्या धोरणशून्य ठाकरे सरकारने त्यापैकी जेमतेम सात टक्के निधी वापरला असून उर्वरित निधी विनावापर पडून असल्याने, जनतेच्या आरोग्याच्या समस्या टांगणीवरच पडल्या आहेत असा गंभीर आरोपही उपाध्ये यांनी केला.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटे दरम्यान वैद्यकीय ऑक्सिजनच्या तुटवड्यामुळे उद्भवलेल्या संकटात राज्यातील सामान्य जनता अक्षरशः होरपळली होती. महाराष्ट्रात तिसरी लाट आल्यास ऑक्सिजनची सज्ज्ता ठेवावी लागेल असा इशारा केंद्राने तेव्हाच दिला होता, व ऑक्सिजन प्रकल्प उभारण्यासाठी सहकार्यदेखील केले होते. मात्र अजूनही राज्यात ऑक्सिजन निर्मितीचे प्रकल्प रेंगाळलेलेच असून राज्य सरकारने ही समस्याच वाऱ्यावर सोडून दिल्याचे चित्र आहे, असेही उपाध्ये म्हणाले.

## जासई विद्यालयातील मुख्याध्यापक कक्ष, अटल लॅब व पाणपोईचे उद्घाटन

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभागातर्फे विद्यालयातील नूतनीकरण केलेला मुख्याध्यापक कक्ष, अटल टिंकरिंग लॅब व पाणपोईचे उद्घाटन 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ७) करण्यात आले.



या कार्यक्रमाला 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य जे. एम. म्हात्रे, स्थानिक सल्लागार समितीचे चेअरमन अरुण जगे, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य व कामगार नेते सुरेश पाटील, जासई ग्रामपंचायत सरपंच संतोष घरत यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या वेळी 'रयत'चे लाईफ मेंबर प्रमोद कोळी, रवींद्र भोईर, सल्लागार समिती सदस्य गोपीनाथ ठाकूर, जासई विद्यालयाचे स्कूल कमिटी सदस्य मधुशेठ पाटील, जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य अरुण घाग, उपप्राचार्य पी. पी. मोरे, रयत सेवक संघाचे अध्यक्ष नुरा शेख, माजी सरपंच रजनी घरत, अमृत ठाकूर, सुनील घरत, चंद्रकांत पाटील, वीर वाजेकर फुंडे कॉलेजचे प्राचार्य बी. टी. पवार, फुंडे हायस्कूलचे प्राचार्य मोहन पाटील, दापोली-पारगाव कॉलेजच्या प्राचार्य पुष्पलता ठाकूर, करंजा येथील शाळेचे मुख्याध्यापक ए. टी. पाटील, फुंडे हायस्कूलचे पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे, जासई विद्यालयाचे पर्यवेक्षक साळुंखे, जगदीश म्हात्रे, यांच्यासह दहा गाव स्कूल कमिटी सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षणप्रेमी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक उपस्थित होते.

## कर्जतमधून आणखी दोन मुली बेपत्ता

**कर्जत :** तालुक्यातून मुली बेपत्ता होण्याचे प्रकारात वाढ झाली आहे. तालुक्यातून नुकत्याच दोन अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याची तक्रार कर्जत व नेरळ पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

मोहाचीवाडी येथे राहणारी १५ वर्षीय मुलगी ३१ डिसेंबरच्या दिवशी व कर्जत पोलीस ठाणे हद्दीतील १६ वर्षीय मुलगी ४ जानेवारीला शाळेत जाते, असे घरातून बाहेर पडल्या, त्या अद्याप घरी आल्या नसल्याने त्यांच्या घराच्यांनी पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केली आहे. दोन्ही मुलींचा शोध सुरू आहे.



पनवेल : आई गावदेवी ग्रामस्थ मंडळ यांच्यातर्फे मोरबे चषकचे आयोजन करण्यात आले आहे. या क्रिकेट स्पर्धेला भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुक्रवारी भेट दिली. या वेळी ओबीसी सेलचे रायगड जिल्हाध्यक्ष एकनाथ देशेकर, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, तालुका चिटणीस नामदेव जमदाडे, रवींद्र पाटील ग्रामपंचायत सदस्य रमेश नावडेकर, रामदास म्हात्रे, एकनाथ नाईक, दिनेश फडके, भगवान म्हात्रे, संजय पाटील, पिंटु म्हात्रे, प्रमोद भगत, ज्ञानेश्वर पालकर, दिनकर नावडे, बाळाराम ऊसाटकर, जनार्दन भगत आदी उपस्थित होते.





पनवेल : श्री मुंजेश्वर सामाजिक व सांस्कृतिक मंडळ, खेरणे यांच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुक्रवारी भेट दिली. या वेळी ओबीसी सेलचे रायगड जिल्हाध्यक्ष एकनाथ देशेकर, अंकुश पाटील, बुधाजी माळी, चंद्रकांत गोंधळी, राजेंद्र गोंधळी आदी उपस्थित होते.



पनवेल : सुकापूर येथे एकता मित्र मंडळ यांच्यातर्फे गुरुवारी साईबाबा पालखी व साई भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अरुणशेठ भगत यांनी भेट देऊन पालखीचे दर्शन घेतले. या वेळी भाजप ओबीसी मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, राजेश पाटील, महेश पाटील, प्राची जाधव, दिवेश भगत, यतीन पाटील, आत्माराम पाटील, हनुमान खुटले, मोनिका खुटले, हिरा केणी, पराग कदम आदी उपस्थित होते.



पनवेल : आकुर्ली येथे श्री गावदेवी महिला मंडळाच्या वतीने श्रीसत्यनारायण महापूजेचे गुरुवारी आयोजन करण्यात आले होते. या महापूजेला पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत महापूजेचे दर्शन घेतले. सोबत पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील.

## पंतप्रधान मोदी यांच्या दीर्घायुष्यासाठी कामोठे भाजपतर्फे महामृत्युंजय मंत्राचा जप

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

पंजाबमध्ये देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुरक्षेतील त्रुटी ह्या विरोधकांनी केल्या असल्याची शंका आल्याच्या पार्श्वभूमीवर भाजप कामोठे मंडलच्या वतीने पंतप्रधान मोदी यांना निरोगी व दीर्घायुष्य लाभो यासाठी महामृत्युंजय मंत्र या जपाचा पारायण सोहळा आयोजित करण्यात आला होता.



पंजाबमधील फिरोजपूर येथे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुरक्षेत देशातील काँग्रेस नेतृत्वाच्या इशाऱ्यावर राज्यातील काँग्रेस सरकारने दुर्लक्ष करून मोठी चूक केली होती, परंतु देवाच्या कृपेने पंतप्रधान या हल्ल्यातून सुखरूप वाचले. यापूर्वी सुरक्षेच्या त्रुटीमुळे देशाने दोन पंतप्रधान गमावले आहेत. त्यामुळे पंतप्रधान मोदी यांना निरोगी व दीर्घायुष्य लाभो यासाठी कामोठ्यात भाजपच्या वतीने महामृत्युंजय मंत्र या जपाचा पारायण सोहळा झाला.

या वेळी भाजप युवा मोर्चा कामोठे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, भटके विमुक्त सेल रायगड जिल्हा महिला अध्यक्ष विद्या तामखडे, आध्यात्मिक सेल संयोजक विनोद खेडकर, मोहन जोशी, कामोठे मंडल चिटणीस मनीषा वणवे, हरीपाल बिष्ट, सुनीता शर्मा, वर्षा शेलार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### पंतप्रधान मोदींच्या सुरक्षेतील त्रुटींच्या विरोधात
## भाजपच्या वतीने कँडल मार्च

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी पंजाबमध्ये रास्ता रोको आणि काँग्रेस पक्षाने केलेल्या सुरक्षा त्रुटींच्या विरोधात भाजपच्या वतीने कँडल मार्च काढण्यात आला.

पनवेलमधील भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात शुक्रवारी (दि. ७) दक्षिण भारत सेल जिल्हा संयोजक श्रीनिवास कोडुरु आणि पनवेल शहर सहसंयोजक सतीश राजू, बुथ अध्यक्ष संजय जाधव, अशोक आंबेकर आदींसोबत भाजप कार्यकर्त्यांनी मेणबत्ती मार्च काढला. यानंतर या मेणबत्या महात्मा गांधी यांच्या प्रतिमेसमोर ठेवण्यात आल्या. या वेळी काँग्रेसला सद्बुद्धी दे असे लिहिलेले प्लेकार्ड दर्शविण्यात आले.




**पान १ वरून**

## महानगरपालिकेच्या सर्वच इमारती सौरऊर्जेने उजळणार

त्यामुळे विजेच्या स्वयंपूर्णतेसह स्वच्छ पनवेलच्या दिशेने महापालिकेने पहिले पाऊल उचलले असे म्हणावे लागेल.

महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी सकाळी ११.३० वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे ऑनलाईन पद्धतीने महासभा घेण्यात आली. या वेळी आयुक्त गणेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त विठ्ठल डाके, नगरसचिव तिलकराज खापर्डे, पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पनवेल महानगरपालिकेला केंद्र शासनामार्फत फाईव्ह स्टार मानांकन मिळण्यासाठीच्या प्रस्तावास सर्वसाधारण सभेची मंजुरी आवश्यक असते. त्याला आजच्या महासभेत एकमताने मंजुरी देण्यात आली.

पनवेल महानगरपालिका मालकीच्या अग्निशमन इमारत, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, मलनिस्सारण प्रक्रिया केंद्र व स्व. विलासराव देशमुख शॉपिंग कॉम्प्लेक्स या ठिकाणी सौरऊर्जा बसविण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. त्यामुळे दरमहा होणारा वीजभाराचा तिजोरीवरील ताण कमी होणार असून या महत्त्वपूर्ण विषयाला आज सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली. पनवेल शहर स्वच्छ होण्याच्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकत स्वच्छ भारत अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्र हागणदारी मुक्तीचा टप्पा ODF++ घोषित करणे, तसेच महाराष्ट्र शासनाच्या पनवेल महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापनाकरिता सुधारित मंजूर प्रकल्प अहवालातील वाढीव घंटागाड्या खरेदी करण्याच्या विषयास महासभेमध्ये मंजुरी देण्यात आली.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील वळवली, भिंगारी व मुरबी (खारघर) या ठिकाणी शाळा बांधकाम करणे, कोयनावेळे येथे समाज मंदिर बांधणे, कळंबोली येथील श्री काळभैरव मंदिरासमोरील सभागृहाचे वाढीव काम करणे, तसेच पनवेल, कळंबोली व खारघर येथील एकूण १४ उद्यानांच्या दोन वर्षाकरिता संगोपन करण्याच्या विषयास सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली. महापालिका हद्दीतील पनवेल शहरातील पटेल मोहल्ला व लगतच्या परिसरातील जुन्या भूमिगत मलनिस्सारण वाहिन्यांच्या जागी नवीन मलनिस्सारण वाहिन्या टाकणे, तसेच धाकटा खांदा, बेलपाडा, नावडे, नौपाडा, मोठा खांदा आणि कामोठे या सहा गावांना पायाभूत सुविधा पुरवण्यास महासभेने मंजुरी दिली.

पनवेल महानगरपालिकेचे स्वतःचे माता व बाल संगोपन केंद्र, हॉस्पिटल उभारण्याबाबत व व्यवहार्यता पडताळणी अहवाल सर्वसाधारण सभेपुढे सादर करून त्याचे प्रेझेंटेशन या वेळी सर्वसाधारण सभेपुढे देण्यात आल्यावर तो अहवाल सर्वानुमते मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिकेच्या सदस्यांसाठी इंदौर येथे प्रशिक्षण व अभ्यास दौरा आयोजन करण्याबाबतच्या निर्णयास महासभेने मंजुरी दिली.

## रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा
### सापडलेले सोन्याचे मंगळसूत्र केले पोलीस ठाण्यात जमा

**पनवेल : वार्ताहर**

चिंचपाडा गावात राहणाऱ्या एका रिक्षाचालकाने महिलेची प्रवासादरम्यान रिक्षामध्ये पडलेले सोन्याचे मंगळसूत्र पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुरुवारी (दि. ६) जमा करून प्रामाणिकपणाची प्रचीती दिली आहे. कुठल्या महिलेचे मंगळसूत्र रिक्षामध्ये हरविले असल्यास त्या महिलेने पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन पोलिसांनी केले आहे.



पनवेल तालुक्यातील चिंचपाडा गावातील रहिवासी व आता स्थलांतरित झालेल्या पुष्पक नोड वडघर येथे राहणारे मंगेश लहू भिंगारकर असे या रिक्षाचालकाचे नाव असून त्यांच्या रिक्षेचा नंबर (एमएच ४६ एसी ३२९७) आहे. मंगेश हे चार दिवसांपूर्वी आपल्या रिक्षामधून पनवेल रेल्वे स्थानक ते करंजाडे वसाहत, पुन्हा करंजाडे वसाहत ते रेल्वे स्थानक अश्या फेरीमध्ये रिक्षा चालवीत आहेत. या वेळी सायंकाळी मंगेश घरी आपल्यानंतर रिक्षामध्ये सोन्याचे मंगळसूत्र पडलेले दिसले. त्याने ती वस्तू घेत प्रकल्पग्रस्त रिक्षा चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष नरेश परदेशी यांची भेट घेत याबाबत माहिती दिली. अखेर गुरुवारी यांनी पनवेल शहर गाठत याबाबतची माहिती पनवेल शहर पोलीस ठाण्यात देऊन तेथे ते जमा केले. पोलिसांनी या प्रामाणिक रिक्षाचालकाचे कौतुक केले. हे मंगळसूत्र ज्या महिलेचे असल्यास त्या महिलेने पनवेल शहर पोलीस ठाण्याहंसी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.




पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
शनिवार, दि. ८ जानेवारी २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा-उरण नाका, पनवेल
३. आय. टी. एम. कॉलेज, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२
८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
१०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
११. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
१२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
१३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
१५. न्यु इंग्लिश स्कुल, कळंबोली

कोवॅक्सिन

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२. काळण समाज हॉल, पनवेल
३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

१५ ते १८ वयोगटाचे लसीकरण

- कोकण एज्युकेशन सोसायटी केव्ही हायस्कूल, पनवेल (उपलब्ध लसी ५००)
- महात्मा मराठी इंटरनॅशनल (सीबीएसई) शाळा, खांदा कॉलनी (५००)
- रायन इंटरनॅशनल स्कुल, नवीन पनवेल (५४८)
- सी. के. ठाकूर विद्यालय मराठी इंग्रजी माध्यमिक, नवीन पनवेल (५००)
- सेंट जोसेफ माध्यमिक हायस्कूल, कळंबोली (५००)
- हार्मनी इंटरनॅशनल स्कुल, खारघर (५००)
- हार्मनी इंटरनॅशनल स्कुल, खारघर (२३८)
- पी. जे. म्हात्रे विद्यालय, नावडे (५००)
- छत्रपती शिवाजी विद्यालय, रोहिंजण (५००)
- संजीवनी इंटरनॅशनल स्कुल/कॉलेज, खारघर (५००)

## निवडक

### एपीएमसीत व्यापाऱ्याची आत्महत्या

**नवी मुंबई :** एपीएमसी फळ मार्केटमध्ये व्यापाऱ्याने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी उघडकीस आली आहे. फळ मार्केटमध्ये सकाळच्या सुमारास संपत कराळे (वय ६२) या व्यापाऱ्याने गळफास घेतला. व्यापाऱ्याच्या आत्महत्येचे नेमके कारण अद्यापही अस्पष्ट आहे. मुंबई एपीएमसी फळ मार्केटमध्ये एन विंग गाळा नंबर ९१४ मध्ये व्यापाऱ्याने गळफास लावला. या प्रकरणी एपीएमसी पोलीस आणि अग्निशमन कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. व्यापाऱ्याचा मृतदेह पोस्टमार्टमसाठी वाशी मनपा रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. व्यापाऱ्याने आत्महत्या का केली? याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही, मात्र मार्केटमध्येच फळ व्यापाऱ्याने आत्महत्या केल्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये खळबळ माजली. एपीएमसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक माणिक नलावडे या प्रकरणी अधिक तपास करत आहेत.

### ट्रेलरची ॲम्ब्युलन्सला धडक; दोघे जखमी

**पनवेल :** भरधाव ट्रेलरची पुढे जाणाऱ्या ॲम्ब्युलन्सला पाठीमागून धडक बसली. झालेल्या अपघातात ॲम्ब्युलन्समधील दोघे जण जखमी झाल्याची घटना तालुक्यातील बारवई गावाच्या हद्दीत घडली आहे. बारवई पोस्ट पोयंजे जुना पुणे हायवे रोडवरील चंद्रप्रकाश कहर (वय ४१) हा त्याच्या ताब्यातील ट्रेलर (एमएच ४८ एजी ४६६४) घेऊन जात होता. या वेळी त्याची पुढे जाणाऱ्या ॲम्ब्युलन्सला पाठीमागून धडक बसली. झालेल्या अपघातात ॲम्ब्युलन्समधील साजिदा काझी (वय ३०) व जयश्री गवई (वय ३८) हे दोघे जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पत्रकारदिनी वनौषधी रोपांचे वाटप



**नवीन पनवेल :** पत्रकार दिनाचे औचित्य साधून साप्ताहिक आर्या प्रहरच्या वतीने पनवेल, पालघर येथे वनौषधी रोपांचे वाटप करण्यात आले. या वेळी 'आर्या प्रहार'च्या अरुण पाटकर, मौसमी तटकरे, राजेश संखे, सुधीर पाटील, संतोष कोरे, अमेय पिंपळे, संजोग संखे, परेश संखे, मुकेश सिंह, उज्वला जगताप, जितेंद्र सावे आदींच्या हस्ते के. आ. बांठीया विद्यालयाचे प्राचार्य भगवान माळी यांच्यासह १०१ नागरिकांना पांढरे चित्रक, कडू चिरायता, कुडा, गुडमार, वैजयंता तुळस, अडुळसा आदी वनौषधी रोपे भेट दिली. या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे नागरिकांनी विशेष कौतुक केले आहे.

### आदिवासी वाडीत वाढदिवस साजरा



**पनवेल :** लाईव्ह महाराष्ट्र ९ न्यूज पोर्टलचे संपादक रवींद्र जनार्दन गायकवाड यांचा वाढदिवस बुधवारी (दि. ५) पनवेल तालुक्यातील चिंचपाडा फणसवाडी येथील आदिवासी वाडीतील मुलांसोबत वाढदिवस साजरा केला. या वेळी जनार्दन गायकवाड, सुनंदा गायकवाड, काजल गायकवाड, प्रकाश जाधव, मंगल जाधव, प्रथमेश गायकवाड, जागृती गायकवाड, शेजल जाधव, अंश, सोनाक्षी, आरोही, विहान हे उपस्थित होते.

### रिपब्लिकन पक्षातर्फे पत्रकारांचा सन्मान

**पनवेल :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाच्या वतीने



पत्रकार दिनानिमित्त रायगड जिल्ह्यासह पनवेल तालुक्यातील पत्रकारांचा जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी सन्मान केला. तसेच जिल्ह्यातील सर्व पत्रकारांना पत्रकार दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. पत्रकारांच्या लेखणीत ताकद असल्याने अनेकांना न्याय मिळतो. अशा पत्रकारांचा सन्मान करणे हे आद्य कर्तव्य असून त्याच भावनेतून आज पनवेल परिसरातील पत्रकारांना सन्मानित केले असल्याचे साळुंखे यांनी सांगितले.

# नवी मुंबईत सर्दी, खोकल्याची साथ

## तापाच्या रुग्णांतही वाढ; दररोज १२०० जणांची तपासणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मागील काही दिवसांपासून कोरोना रुग्णांची संख्या वाढत असून नवी मुंबईत दीड हजारापर्यंत कोरोना रुग्णांचा आकडा गेला आहे. त्यात, वातावरणात झालेल्या बदलामुळे सगळीकडे सर्दी, खोकला आणि तापाची साथ पसरली आहे. सध्याच्या कोरोना संसर्गाची लक्षणेही सारखीच आहेत. त्यामुळे अनेक नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. पालिका रुग्णालयांसह खासगी रुग्णालयात उपचारासाठी रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. दररोज १२०० पर्यंत रुग्णांची तपासणी केली जात आहे.

कोरोना रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत असतानाच वातावरण बदलामुळे मागील दोन दिवसांपासून सर्दी, खोकला आणि तापाची साथ पसरली आहे. गेल्या दोन दिवसांपासून दवाखान्यात या रुग्णांची गर्दी वाढली आहे. वाशीतील पालिका रुग्णालयात या रुग्णांची मोठी वाढ झाली असून बाह्यरुग्ण सेवेचा ताण वाढला आहे. विलगीकरण आणि



इतर नियमांचे पालन करावे लागू नये म्हणून हे रुग्ण करोना चाचणी करण्याचे टाळत आहेत. घरातच उपचार किंवा जवळील खासगी डॉक्टरांचा सल्ला घेत आहेत.

आलेला ताप हा कोरोनाचा ताप असल्याने काहीजण घरीच उपचार घेत आहेत. मात्र नागिरकांनी न घाबरता साधा ताप हा वातावरणातील बदलामुळे येत असून रुग्णांनी योग्य ते उपचार करणे आवश्यक आहे. वाशी रुग्णालयात दररोजच्या बाह्यरुग्ण तपासणी विभागात ताप, सर्दी, खोकला असलेल्या रुग्णांची संख्या मागील आठवड्यापासून वाढतच आहे. खासगी क्लिनिकमध्येही रुग्ण गर्दी करत आहेत. त्यामुळे शहरातील सामान्यांच्या खिशाला परवडणाऱ्या आरोग्यसेवेवर ताण पडत आहे. त्याचा फटका मात्र गरीब रुग्णांना सहन करावा लागत आहे. पालिकेच्या २३ नागरी आरोग्य केंद्रांतही सकाळच्या वेळात रुग्णांची संख्या अधिक आहे. नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आवश्यक असलेल्या रुग्णसेवेवर परिणाम दिसून येत आहे.

> **नवी मुंबई शहरात पालिकेच्या बाह्यरुग्ण विभागात रुग्णांची संख्या ११०० ते १२०० असून त्यात ताप, सर्दी, खोकल्याचे रुग्ण अधिक आहेत. परंतु हा वातावरणातील बदल असून ताप आला म्हणजे करोना झाला असे नाही. नागरिकांनी साधा तापही अंगावर न काढता योग्य उपचार घ्यावेत.**
>
> **-डॉ. प्रशांत जवादे, वाशी सार्वजनिक रुग्णालय**

# खारघरमधील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात प्रतिकृती स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**


जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील लेखा आणि वित्त विभागाने शुक्रवारी (दि. ७) प्रतिकृती स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय मराठे आयक्यूएसीचे समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे व इतर प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी आयोजित स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील लेखा आणि वित्त विभागातील विद्यार्थ्यांनी आपल्या विविध रचना आणि कला गुणांचे प्रदर्शन करून विविध प्रतिकृती सादर केल्या. या स्पर्धेसाठी विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्तम प्रतिसाद दिला.

या स्पर्धेचे आयोजन लेखा आणि वित्त विभागाच्या प्रा. करिश्मा पाटील यांनी केले. तसेच प्रा. प्रवर शर्मा व प्रा. सानिया नाचन, प्रा. मानसी शाहा यांनी सहकार्य केले.

या स्पर्धेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिध्देश्वर गडदे यांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले.



# उरणमध्ये विविध कोर्सेसच्या प्रमाणपत्रांचे वितरण

## महिला व बालकल्याण स्वास्थ्य समितीमार्फत उपक्रम

**उरण : वार्ताहर**

उरण नगर परिषदेच्या सभागृहात नुकताच महिला बालकल्याण आणि स्वास्थ्य समितीमार्फत विविध कोर्सेस झाले. या कोर्सच्या प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. काही महिलांनी प्रशिक्षणानंतर आपले छोटेमोठे व्यवसायही सुरू केले आहेत. महिलांनी नगर परिषदेकडून मिळालेल्या या संधीचे सोने केले आहे.

उरण नगर परिषदेच्या महिला बालकल्याण आणि स्वास्थ्य समितीच्या वतीने विविध कोर्स घेण्यात आले. त्यात ॲडव्हान्स केक मेकिंग, विविध प्रकारचे मसाले, मेहंदी, योग शिबिर, ग्रेव्ही प्रीमिक्स बनवणे, शिवणकाम, प्रशिक्षण ॲडव्हान्स ब्युटी पार्लर, बेसिक केक, डाटा एन्ट्री, ॲडव्हान्स फॅशन डिझाईन आदी कोर्सचे प्रशिक्षण देण्यात आले. कोर्स पूर्ण झाल्यावर महिलांना प्रशिक्षण पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले.

या कार्यक्रमात नगराध्यक्ष सायली म्हात्रे यांनी महिलांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा पुरेपूर उपयोग करून घ्या व स्वतःच्या पायावर उभे राहा, असे सांगितले. महिला व बालकल्याण स्वास्थ्य समिती सभापती स्नेहल कासारे यांनी महिलांसाठी विविध प्रकारचे कोर्सेस लावून ते यशस्वीरित्या पार पाडले.

या वेळी मुख्याधिकारी संतोष माळी, नगरसेविका आशा शेलार, दमयंती म्हात्रे, जान्हवी पंडित, रजनी कोळी, भाजप उरण शहराध्यक्ष संपूर्णा थळी, नगर परिषदेचे कर्मचारी संजय पवार आदी उपस्थित होते.





**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कोपर येथील त्यांचे बालमित्र बाबुराव कांबळे यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या वेळी भाजपचे कोपर गाव अध्यक्ष सुधीर ठाकूर, उपसरपंच विजय घरत, ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, महिला मोर्चा उपाध्यक्ष सुजाता पाटील, ज्येष्ठ नेते वसंत पाटील, माजी उपसरपंच रामदास ठाकूर, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाचे चेअरमन भार्गव ठाकूर, अनंता ठाकूर, भाऊ भोईर, संदीप म्हात्रे, किशोर पाटील, कमलाकर घरत, गजानन घरत, आशिष घरत, विलास पाटील आदी उपस्थित होते.**



**पनवेल : शिरवली ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी अशोक पाटील यांची नुकतीच निवड झाली आहे. याबद्दल त्यांचे भाजप ओबीसी रायगड जिल्हा अध्यक्ष एकनाथ देशेकर, तालुका चिटणीस नामदेव जमदाडे, रवींद्र पाटील, उमेश वारदे, भालचंद्र शिनारे, परशुराम चोरघे, लक्ष्मण पाटील, परशुराम रिकामे, दीपक बोडे, महेश पाटील, भाऊदास शिनारे, वसंत भगत, गणेश रंधवी, योगेश शेळके, लहु मुंढे आदी उपस्थित होते.**



**पनवेल : पंतप्रधान मोदींनी देशातील गोरगरीब असंघटित कामगारांसाठी सुरू केलेल्या ई-श्रम कार्ड योजनेंतर्गत भाजप महिला मोर्चा तालुका सरचिटणीस शिल्पा म्हात्रे यांच्या माध्यमातून कोन गावात महिला बचत गटातील महिलांना ई-श्रम कार्डचे वाटप करण्यात आले. या वेळी सुषमा भागीत, कल्पना पाटील, प्रियंका म्हात्रे, श्रीकला कोंडिलकर आदी महिलांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.**



**पनवेल : प्रभाग क्रमांक १९च्या नगरसेविका दर्शना भगवान भोईर यांच्या प्रयत्नातून श्वानांचे ॲन्टी रेबीज लसीकरण करण्यात आले. यामध्ये प्रभागातील श्वानांना पकडून त्यांना ॲन्टी रेबीज लस देण्यात आली. या वेळी मॅनेजर शैलेंद्र सावंत, सुपरवायझर कल्पेश कदम, सत्यवान भिसे, कॅचर अविनाश कांबळे, वैभव मोहिते, सुमित कदम, आशिष कदम आदी उपस्थित होते.**

# जनजागृती ग्राहक मंचच्या अध्यक्षपदी काशिनाथ जाधव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील जनजागृती ग्राहक मंचच्या पनवेल शाखेची त्रैवार्षिक निवडणूक नुकतीच पनवेल येथे झाली. यामध्ये अध्यक्षपदी काशिनाथ लक्ष्मण जाधव यांची, तर उपाध्यक्षपदी सुभाष शालिक फडके यांची बिनविरोध निवड करण्यात आली.



त्याचबरोबर बी. पी. म्हात्रे सचिव, रमेश धोंडू चव्हाण खजिनदार, राजकुमार शंकरराव ताकमोगे सहसचिव, तसेच सदस्यपदी संतोष हरिभाऊ विचारे, दत्तात्रय त्रिंबक जाधव, कमलेश बाबुलाल अग्रवाल, डॉ. किरण गणू फडके, भक्ती चेतन जोशी, अब्दुलगणी हसन अत्तार, शिवदास नारायण पालकर, जयदास नारायण भोपी, दिलीप चंद्रकांत मोरे, चेतन अशोक ठाकूर, अभिषेक विजया मस्के, सुभाष बाळकृष्ण मेहतर, अशोक नामदेव नाईक यांची बिनविरोध निवडून आले. निवडलेल्या सदस्यांपैकी बी. पी. म्हात्रे, संतोष हरिभाऊ विचारे यांची जिल्हा प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. सुनील खेडेकर यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कामगिरी बजावली.

# गावच्या प्रवेशद्वार कमानीवर विद्युत दिवे बसविण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील सीवूड दारावे या गावाच्या प्रवेशद्वारावर विद्युत दिवे बसवावेत, अशी मागणी भाजपचे युवा मोर्चा महामंत्री रणजित नाईक यांनी विद्युत विभागाकडे केली आहे.

नवी मुंबई शहरातील गावांची ओळख व्हावी यासाठी महापालिकेच्या माध्यमातून शहरातील सर्वच गावांच्या परिसरात प्रवेशद्वारावर कमानी तयार करण्यात आल्या आहेत. सीवूड दारावे सेक्टर २३ मधील दारावे गावाच्या प्रवेशद्वारावरील कमानीचे काम पूर्ण झाले असताना अद्याप विद्युत दिवे बसविण्यात आले नाहीत. त्यामुळे प्रवेशद्वाराचे नाव अंधारात दिसून येत नाही. प्रवेशद्वारावर विद्युत दिवे बसवावेत. विद्युत दिवे न लावण्यात आल्याने कमानीवरील नाव अंधारात दिसत नाही. शहरातील अनेक गावांच्या कमानींवर पालिकेने विद्युत दिवे लावले असल्याने गावाचे नाव झळाळत असते, मात्र दारावे गावबाबत पालिकेची उदासीनता का? असा प्रश्न नाईक यांनी विचारला आहे. लहान सहान बाबींसाठी पालिकेकडे तक्रार का करावी लागते? असे अनेक प्रश्न विचारत नाईक यांनी विद्युत दिवे लावण्याची मागणी पत्रातून केली आहे.

## संपादकीय

# सहकाराला केंद्राकडून गोड भेट

गेल्या ३५ वर्षांपासून भिजत पडलेला साखरेबाबतच्या प्राप्तिकराचा प्रश्न केंद्रातील मोदी सरकारने गुरुवारी एका फटक्यात निकालात काढला. सहकारी साखर कारखान्यांना त्यामुळे मोठाच दिलासा मिळाला आहे. या निर्णयाचा सर्वाधिक फायदा महाराष्ट्रातील सर्व सहकारी साखर कारखान्यांना होईल हे वेगळे सांगायची गरज नाही. देशाचे पहिले केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी अर्थ मंत्रालयाशी सातत्याने चर्चा करून प्राप्तिकराचा हा तिढा कायमचा सोडवून टाकला आहे.

**महाराष्ट्रामध्ये सहकार चळवळीने सर्वप्रथम पाळेमुळे रोवली. सहकाराचा वृक्ष याच महाराष्ट्राच्या भूमीत बहरला. आजमितीस महाराष्ट्रात शेकडो सहकारी साखर कारखाने आहेत. या साखर कारखान्यांना विशिष्ट भावातच शेतकऱ्यांकडून ऊस खरेदी करावा लागतो. किमान तसे अपेक्षित असते. हा भाव किंवा मूल्य केंद्र सरकार किंवा राज्य सरकारने ठरवून दिलेले असते. त्याला एफआरपी (रास्त व किफायतशीर किंमत) असे म्हटले जाते. अनेक सहकारी साखर कारखाने या ठराविक मूल्यापेक्षाही अधिक किंमत देऊन शेतकऱ्यांकडून ऊस खरेदी करतात. तसे करणे अनेकदा अपरिहार्य असते. सहकार तत्त्वावर चालणारे साखर कारखाने शेतकऱ्यांच्या जोरावरच चालत असतात. एका अर्थी ऊसउत्पादक शेतकरीच या साखर कारखान्यांचे हिस्सेदार किंवा मालक असतात. आपल्याच सहकारी साखर कारखान्याकडून समाधानकारक मोबदला मिळणार नसेल तर सहकार चळवळीचा काय उपयोग, असा रास्त सवाल गेली तीन दशके वेळोवेळी विचारला जात होता. कारण या वाढीव किमतीवर सहकारी साखर कारखान्यांना प्राप्तिकर भरावा लागत असे. काँग्रेस राजवटीत सहकारी साखर कारखान्यांचे राजकारणामध्ये विशेष प्राबल्य होते. किंबहुना साखर कारखान्यांचे विश्व हे राजकीय पुढाऱ्यांचे पाळणाघर मानले जाई. महाराष्ट्रातील शुगर लॉबी राज्याचे सरकार हलवून सोडण्याची क्षमता राखून होती. इतका दबदबा असूनही वाढीव मूल्यावर प्राप्तिकर भरण्याची सक्ती काही संपुष्टात आली नाही. महाराष्ट्रातील दिग्गज पुढाऱ्यांनी वेळोवेळी हा प्रश्न केंद्रीय पातळीवर उपस्थित केला, परंतु अर्थ मंत्रालयाकडून त्याला कधीही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात देखील हा प्रश्न अनेकदा उपस्थित झाला. परंतु तत्कालीन अर्थमंत्री पी. चिदंबरम् यांनी साखर उत्पादकांच्या प्रश्नांकडे कायम दुर्लक्ष केले. यातली आणखी एक मेख अशी की अर्थ मंत्रालयामध्ये नोकरशाहीचा विशेष वरचष्मा असतो. त्यातही या खात्यामध्ये दाक्षिणात्य अधिकाऱ्यांचा भरणा नेहमीच अधिक प्रमाणात राहिला आहे. त्यामुळे साखर उत्पादक शेतकरी आणि सहकार चळवळीतील व्यवहार याबाबींकडे संवेदनशीलपणे पाहण्याचा दृष्टिकोनच नव्हता. शेतकऱ्यांच्या हितासाठी सदैव जागरूक असणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मात्र साखर उत्पादक शेतकऱ्यांचे दु:ख कळले. शेतकऱ्यांचे प्रश्न मिटावेत, सहकार चळवळीने पुन्हा एकदा सुवर्णयुग अनुभवावे यासाठी मोदी सरकारने अनेक पावले उचलली. सहकार मंत्रालय स्थापन करण्याचा निर्णय हा त्या दृष्टिकोनातूनच घेतला गेला होता. जे आधीच्या कुठल्याही सरकारला जमले नाही, ते मोदी-शाह यांच्या लोकाभिमुख सरकारने एका झटक्यात करून दाखवले. या निर्णयामुळे प्राप्तिकर विभागाने तब्बल साडेनऊ हजार कोटी रुपयांच्या कर रकमेवर पाणी सोडण्याची तयारी दाखवली आहे. असे निर्णय घेण्यासाठी धाडस लागते आणि त्याच्या जोडीला राजकीय इच्छाशक्ती. मोदी सरकारकडे या दोन्ही गोष्टी आहेत. म्हणूनच नववर्षाच्या प्रारंभी सहकार चळवळीला ही गोड भेट मिळाली आहे.**

# पाली शहरात खड्डे, धुरळ्याचा त्रास





महाराष्ट्रातील प्रसिद्ध अष्टविनायक क्षेत्र आणि सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पाली शहरातील रस्त्यांची प्रचंड दुरवस्था झाली आहे. डम्परमधून उडणाऱ्या व खड्ड्यांतून निघणाऱ्या धुरळ्याचा खूप त्रास होत आहे. यामुळे येथे येणारे भाविक व स्थानिक नागरिक हैराण झाले आहेत.

पालीतून होणाऱ्या अवजड वाहतुकीमुळे खड्ड्यांनी डोकं वर काढले आहे. शिवाय खड्ड्यात टाकलेली खडी व ग्रीट बाहेर येऊन खूप मोठ्या प्रमाणात धुरळा उडत आहे. डम्परमधूनही मोठ्या प्रमाणावर धुरळा उडत आहे. यावर काही ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी पालीतील नागरिक करीत आहेत.


खराब रस्त्यामुळे नवीन वर्षात बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची व खरेदीसाठी पालीत येणाऱ्या नागरिकांची खूप गैरसोय होत आहे. पाली स्टेट बँकपासून म. गांधी चौक, महावीर मार्ग ते थेट गणेश मंदिरापर्यंतच्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. आगरआळी, सावंतआळी, रामआळी ते मधल्या आळीपर्यंतचा रस्ता, भोईआळी, मिनिडोअर स्टँड ते बसस्थानकपर्यंतच्या रस्त्याची मोठमोठ्या खड्ड्यांनी अक्षरशः चाळण झाली आहे. त्याचबरोबर बल्लाळेश्वरनगर, धुंडीविनायकनगर व शिळोशी आणि मढाळी गावाकडे जाणारा रस्ता मोठ्या प्रमाणावर फुटला आहे. काही ठिकाणचे रस्ते कित्येक वर्षे दुरुस्तही झाले नाहीत. शहरातील मुख्य रस्त्यासह अंतर्गत रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात तर या रस्त्यांवर अक्षरश तलावजन्य परिस्थिती दिसून आली होती. तीन-चार वेळा खडी व ग्रीट टाकून हे खड्डे तात्पुरत्या स्वरूपात भरण्यात आले होते, मात्र डंपर व अवजड वाहने गेल्याने खड्ड्यातील बारीक खडी रस्त्यावर पसरली आहे. त्यावरून जाताना दुचाकी वाहने घसरतात. अपघाताचे प्रमाणदेखील वाढले आहे. येथील कुंभारआळीजवळ दुचाकीस्वार घसरून पडला. तर दोन महिन्यांपूर्वी एक शिक्षिका दुचाकीवरून खड्ड्यात आढळून पडल्या होत्या. यात त्यांना मुका मारदेखील लागला होता. असे अपघात वारंवार घडत आहेत. खड्डे व खडीमुळे पादचाऱ्यांना चालताना कसरत करावी लागते.

विद्यार्थी, महिला व वृद्धांची तर खूपच गैरसोय होते. खड्ड्यांमुळे वारंवार वाहतूक कोंडी देखील होत आहे. प्रत्येक जण या खराब रस्त्याबद्दल संताप व्यक्त करत आहेत.

**■ उपाय कुचकामी**

***नगरपंचायतीतर्फे दोन-तीन वेळा येथील खड्ड्यात तात्पुरत्या स्वरूपात बारीक खडी व चुरा टाकून खड्डे बुजविण्यात आले होते. मात्र सतत डम्पर व अवजड वाहनांची ये-जा होत असल्यामुळे खड्ड्यांनी पुन्हा डोके वर काढले आहे. आता तर हे खड्डे आणखी खोल व रुंद झाले आहेत. पालीतील रस्ते दुरुस्तीसाठी निधी आला आहे. आता आचारसंहिता आहे. नगरपंचायत निवडणुका झाल्यानंतरच याबाबत भूमिका घेतली जाण्याची शक्यता आहे.***

**धुरळा व खड्ड्यांमुळे नागरिक व वाहनचालकांची वाताहत होत आहे. येणारे भाविकदेखील त्रस्त आहेत. काही ठिकाणचे रस्ते कित्येक वर्षे दुरुस्तदेखील झाले नाहीत. पालीतील रस्ते लवकरात लवकर सुस्थितीत करणे आवश्यक आहे.**
**-बशीर परबळकर, नागरिक, पाली, ता. सुधागड**



**खबरबात**
**धम्मशील सावंत**



# पेणमध्ये आदिवासींना वनहक्क दस्तऐवजाचे वाटप

**पेण : प्रतिनिधी**

स्वातंत्र्यदिनाच्या अमृत महोत्सवानिमित्त कातकरी उत्थान अभियानांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने पेण नगर परिषदेच्या सभागृहात आदिवासींना वनहक्क दस्तऐवजाचे वाटप करण्यात आले.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात १६ आदिवासी, कातकरी लाभार्थ्यांना वनहक्क दस्तऐवजाचे वाटप करण्यात आले. आज खऱ्या अर्थाने लाभार्थी आदिवासी बांधव जमीनीचे मालक झाले असून त्याचा लाभ त्यांनी घ्यावा, असे आवाहन आमदार रविशेठ पाटील यांनी यावेळी केले. या कार्यक्रमात दूरदृष्य प्रणालीद्वारे विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे आणि पालकमंत्री अदिती तटकरे यांनी मार्गदर्शन केले.

रायगडचे उपवनसंरक्षक अधिकारी आशिष ठाकरे यांनी वनहक्क दस्तऐवज योजनेची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोगिता ठुबे यांनी केले. पेणचे तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी जीवन पाटील, साकव सामजिक संस्थेचे अध्यक्ष अरुण शिवकर, पेणचे वनक्षेत्रपाल कुलदीप पाटकर, वडखळ वनक्षेत्रपाल स्वाती डुंबरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. प्रांत विठ्ठल इनामदार यांनी आभार मानले.





(छाया : अनिस मनियार)

# कर्जतच्या शारदा मंदिरामध्ये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव




(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : प्रतिनिधी**

येथील शारदा मंदिर इंग्लिश मिडीयम स्कुलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रम सादर केला.

कर्जत शहरातील शाळा मागील एक ते दिड वर्षांपासून कोरोना महामारीमुळ ऑनलाइन पद्धतीने सुरू होत्या. काही महिन्यांपूर्वी प्रत्यक्ष शाळा सुरू झाल्या आणि मुलांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नवनवीन उपक्रम राबविणाऱ्या शारदा मंदिर इंग्लिश मीडियम स्कूलचे नुकताच स्नेहसंमेलन झाले. त्यात विद्यार्थ्यांच्या सहकार्याने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. त्याचे उद्घाटन डॉ. दिपाली मोघे आणि डॉ. अंजली गांगल यांच्या हस्ते करण्यात आले.

**विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**

शारदा मंदिरच्या इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमात देशातील क्रांतिकारक, साधु-संत, देवदेवता, गडकिल्ले, वन्यजीव तसेच भारतभुमीतील रणरागिणी यांच्या इतिहासाची आठवण करून देणारी सुरेख भित्तीचित्रे काढून भारतमातेचा इतिहास पुनर्जीवित केला होता.

# सुधागडात गावठी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांवर कारवाई

## तिघांवर पाली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील पेंढारमाळ हद्दीत अवैधरीत्या गावठी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. याप्रकरणी पाली पोलीस ठाण्यात तिघा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आली आहे.

पेंढारमाळ परिसरातील जंगल भागात अवैधरीत्या गावठी दारू निर्मिती व विक्री करण्यात येत असल्याची खबर मिळाल्यानंतर पाली पोलिसांनी तेथे धाड टाकली. त्या वेळी कमा वाक, पांडू चौधरी, उमी घुटे (रा. पेंढारमाळ, पोस्ट घोटावडे) हे संगनमत करून बेकायदेशीररीत्या गावठी दारू तयार करण्याचे साहित्य, भांडी, साधने, उपकरणे जवळ बाळगून त्याद्वारे दारू गाळण्याची भट्टी चालवीत असल्याचे निदर्शनास आले. त्या भट्टीतून गाळलेली दारू ते ड्रममधून विक्री करीत असत. पाली पोलिसांनी धाड टाकून ही दारूभट्टी उद्ध्वस्त केली.

या प्रकरणी पाली पोलीस ठाण्यात तिघा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, एन. डी. महाडिक अधिक तपास करीत आहेत.



(छाया : धम्मशील सावंत)

# कर्जतमध्ये ५० ज्येष्ठांना नि-कॅपचे वाटप

**कर्जत : बातमीदार**

ऑल सोशल क्राइम कंट्रोल अ‍ॅण्ड अँटीकरप्शन ऑर्गनायझेशन फाउंडेशन आणि मनुश्री फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जतमध्ये नुकताच ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यावेळी गुडघे दुखीचा त्रास असलेल्या ५० ज्येष्ठ नागरिकांना नि-कॅपचे वाटप करण्यात आले.

कर्जतचे पोलीस उपअधीक्षक विजय लगारे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. मनुश्री फाउंडेशनच्या वतीने उपस्थित ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यानंतर गुडघेदुखी असलेल्या ५० ज्येष्ठ नागरिकांना नि-कॅप साहित्याचे वाटप करण्यात आले. नगरसेविका संचिता पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनवणे, फाउंडेशनचे अध्यक्ष निलेश नेर्लेकर, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर साळोखे, किशोर शितोळे, वासंती शिंदे, अ‍ॅड. संदीप साळवी, मारुती हजारे, रतन लोगले, उत्तम ठोंबरे, शांताराम मिरकुटे, रमेश ताकसांडे, अतुल बडगुजर, निखिल कोळंबे आदी या वेळी उपस्थित होते.



# कर्जतमध्ये अखंड हरिनाम सप्ताह

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील श्री माऊली निवास येथे शुक्रवार (दि. ७) पासून ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात झाली. १४ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या सप्ताहात गर्दी टाळण्यासाठी प्रवचन, कीर्तन, भजन होणार नसून, केवळ पारायण व हरिपाठ होणार आहे.

कपालेश्वर मंदिरातून माऊलींना श्री माऊली निवास येथे आणण्यात आले. वनिता म्हसे यांच्या हस्ते ओवाळणी करून, अमोल व कोमल देशमुख यांनी विधिवत महापूजन केले आणि पारायणास प्रारंभ झाला. पौरोहित्य नरेंद्र जोशी यांनी केले.

या वेळी पारायण समितीचे अध्यक्ष हभप नथुराम हरपुडे, खजिनदार संतोष वैद्य, दत्तात्रेय म्हसे, वासुदेव इंगळे, प्रभाकर केळकर, सुदाम कार्ले, रत्नप्रमा जोशी आदी उपस्थित होते.

# नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पर्यटकांवर कारवाई

## मुरूड तहसीलदारांनी केली ६५ हजारांची दंडवसुली

**मुरूड : प्रतिनिधी**

कोरोना, ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पर्यकांकडून मुरूड प्रशासनाने ६५ हजार रुपयांची दंडवसुली केली.

नाताळ, थर्टी फर्स्ट साजरा करण्यासाठी, तसेच नववर्षाचे स्वागत करण्यासाठी मुरूड तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पर्यटक आले होते. या काळात मुरूड तहसीलदार गोविंद वाकडे यांनी मंडळ अधिकारी, तलाठी व अन्य कर्मचारी, तसेच पोलीस यंत्रणेच्या मदतीने तालुक्यातील साळाव चेकपोस्ट, मुरूड व काशीद बीच, ऐतिहासिक जंजिरा किल्ला येथे विनामास्क आढळलेल्या १३० पर्यटकांकडून तब्बल ६५ हजार रुपयांची दंडवसुली केली.



# रायगड जिल्ह्यातील कोरोना रुग्णवाढ झपाट्याने

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील करोना रुग्णांची वाढ झपाट्याने होत आहे. जिल्ह्यात सहा दिवसात साडे तीन हजारहून अधिक रुग्ण आढळून आले आहेत. रुग्णांची वाढ वेगात होत असली तरी लसीकरण झाले असल्यामुळे परिस्थिती गंभीर होणार नाही, असा प्रशासनाला विश्वास आहे.



जिल्ह्यात १ जानेवारी २०२२ रोजी १९६ नवीन रुग्ण आढळले होते. त्यावेळी एकूण रुग्णसंख्या ७७३ होती. २ जानेवारी रोजी २८४ नवीन रुग्ण आढळले, एकूण रुग्णसंख्या १००३ होती. ही संख्या झपाट्याने वाढत असून ६ जानेवारी रोजी १०९६ नवीन रुग्ण आढळले आणि एकूण रुग्णसंख्या ३५५७ वर पोहोचली. त्यामुळे चिंता वाढली आहे.

रायगड जिल्ह्यात कोरोना रुग्णसंख्येत चिंताजनक वाढ होत आहे. दैनंदिन रुग्णसंख्या हजाराच्या वर गेली आहे. गुरुवारी दिवसभरात एक हजार ९६ नवे रुग्ण सापडले आहेत. पनवेलबरोबर अलिबाग, पेण आणि कर्जत हे तालुके रुग्णवाढीत आघाडीवर आहेत. सध्या उपचाराधीन रुग्णसंख्या तीन हजार ५५७ वर पोहोचली आहे. त्यातच ओमायक्रॉनच्या १२ रुग्णांबरोबर डेल्टा व्हेरियंटचे तीन रुग्ण सापडले आहेत.

जिल्ह्यात कोरोना रुग्ण वाढत असले तरी लसीकरणदेखील मोठ्या प्रमाणावर झाले आहे. जिल्ह्यातील ९२ टक्के नागरिकांनी करोना प्रतिबंधक लसीचा पहिला डोस घेतला आहे. तर ७२ टक्के नागरिकांनी दुसरा डोस घेतला आहे. त्यामुळे तिसऱ्या लाटेत प्रादुर्भाव जास्त असला तरी परिस्थिती गंभीर होणार नाही, असा विश्वास प्रशासनाला आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयात कोविड कॉल सेंटर

***रायगड जिल्ह्यात कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. शहरी भागाबरोबर ग्रामीण भागातही कोरोनाने पुन्हा शिरकाव केला आहे. या रुग्णांवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात कोविड कॉल सेंटर सुरू करण्यात आले आहे. रुग्णांच्या हालचाली, त्यांची प्रकृती, लागणारी मदत याबाबत संपर्क साधून माहिती घेतली जाणार आहे.***

**इसीआरपी अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य मिशनला निधी उपलब्ध झाला आहे. आवश्यक खरेदीसाठी काही निधी वितरीत केला आहे. भविष्यात नवीन कोविड सेंटर्स, लहान मुलांचे कोविड वॉर्ड, अतिदक्षता कक्ष सुरू केले जातील. कोविडचा प्रादूर्भाव टाळण्यासाठी नागरिकांनी आवश्यक ती सर्व खबरदारी घ्यावी.**
**–डॉ. सुहास माने, जिल्हा शल्यचिकीत्सक, रायगड**

तिसरी लाट थोपवण्यासाठी शासनाने ४० कोटी निधी मंजूर केला असून काही निधी वर्गही केला आहे. यामध्ये ऑक्सिजन टँक, लहान मुलांचे आयसीयू, जनरल आयसीयू बनविले जाणार आहेत. यासाठीची साहित्य खरेदी लवकरच केली जाणार आहे. १०० खाटांची सोय असलेल्या जिल्हा, उपजिल्हा रुग्णालयातही बेड संख्या वाढवली जाणार आहे. ५० बेड असलेल्या रुग्णालयांसाठी निधी उपलब्ध झालेला नसला तरी मागणी शासनाकडे प्रस्तावित आहे. एकंदरीत जिल्ह्यात तिसरी लाट रोखण्यासाठी प्रशासनाकडून पूर्ण तयारी केली गेली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात कोविड कॉल सेंटर उभारण्यात आले असून रुग्णांवर येथून लक्ष ठेवले जाणार आहे.

# कर्जतमध्ये सलग तिसऱ्या दिवशी कोरोना रुग्णांत वाढ

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यात कोरोना रुग्णांच्या संख्येत सलग तिसऱ्या दिवशी वाढ झाली आहे. तालुक्यातील एका डॉक्टरसह एका आश्रमशाळेची मुलगी आणि जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिकादेखील शुक्रवारी कोरोना पॉझिटिव्ह आढळल्या आहेत. दरम्यान, कर्जत तालुक्यातील अनेक फार्महाऊस आणि रिसॉर्टमधील कामगारांना कोरोनाने आपले लक्ष्य केले आहे.

कर्जत तालुक्यात मागील दोन दिवस २५ हुन अधिक कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण सापडले होते. तर शुक्रवारी (दि. ७) तब्बल ४५ कोरोना रुग्ण आढळून आले. मात्र त्यात एकही ओमायक्रॉनचा रुग्ण नाही.

नाताळ, थर्टी फर्स्ट, नववर्षाच्या स्वागता निमित्ताने कर्जत तालुक्यातील काही दिवस मोठ्या संख्येने पर्यटक आले होते. त्यानंतर फार्महाऊस, रिसॉर्ट तसेच माथेरानमधील हॉटेल्समध्ये काम करणाऱ्या कामगारांना कोरोनाची लागण झाल्याचे दिसून येत आहे. माथेरानमधील चार हॉटेल्समधील कामगार कोरोना पॉझिटिव्ह झाले आहेत.

कर्जत तालुक्यातील भालीवडी आश्रमशाळेची १६ वर्षीय विद्यार्थीनी कोरोना पॉझिटिव्ह झाल्याने शाळा व्यवस्थापना पुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एका शिक्षिकेला कोरोना झाल्याने बोरिवली (ता. कर्जत) गावातील प्राथमिक शाळा बंद ठेवावी लागली आहे.

सोलनपाडा येथे असलेल्या विजयभूमी विद्यापीठामधील तिघांना कोरोना झाला आहे. तर कर्जत उपजिल्हा रुग्णालयामधील दोन आणि कडाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील एक अशा तीन कर्मचाऱ्यांना कोरोना झाला आहे. तालुक्यातील एका मोठ्या हॉस्पिटलच्या प्रमुख डॉक्टरांनासुध्दा कोरोनाने विळखा घातला आहे.

# शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करा

## रोहा सिटीझन फोरमची मागणी

(छाया : जितेंद्र जाधव)



**धाटाव : प्रतिनिधी**

मुख्य जलवाहिनी नादुरुस्त झाल्यामुळे काही दिवसांपुर्वी रोहे शहराचा पाणीपुरवठा बंद झाला होता. सहा दिवसांनंतर शहराचा पाणीपुरवठा सुरू झाला खरा परंतु अनेक भागात अजूनही अपुरा, अनियमित पाणीपुरवठा होत आहे. रोहा तालुका सिटीझन फोरमच्या शिष्टमंडळाने गुरुवारी नगर परिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांची भेट घेतली आणि शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करा, पाणी संकटाला जबाबदार असलेल्यांवर कारवाईची मागणी केली.

रोहा नगर परिषदेची १३.५ कोटी रुपये खर्चाची नवीन वाढीव नळपाणी योजना कार्यान्वित झाली आहे. मात्र जलवाहिन्यांचे काम चुकीचे, नियोजन शून्य व दर्जाहीन करण्यात आल्याने जलवाहिन्यांमध्ये वारंवार बिघाड होत असतो. तांत्रिक दुरुस्तीसाठी शहराचा पाणीपुरवठा महिन्यातून दोन दिवस बंद ठेवण्यात येतो. गेल्या महिन्यात तर सहा दिवस पाणीबाणी ओढवली होती. त्यानंतर शहराचा पाणीपुरवठा सुरू झाला असला तरी नागरिकांना खूप कमी प्रमाणात पाणी उपलब्ध होत आहे.

**जलवाहिनी दुरुस्तीनंतर काही दिवस शहरात कमी दाबाने पाणीपुरवठा सुरू होता. आता दीडशे एचपी मोटारद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे येत्या तीन ते चार दिवसांत नागरिकांना नियमित मुबलक पाणी उपलब्ध होईल.**
**–दयानंद गोरे, मुख्याधिकारी, रोहा नगर परिषद**

शहराचा पाणीपुरवठा तसेच वाढीव नळपाणी योजनेत झालेल्या सावळागोंधळाबाबत रोहा सिटीझन फोरमच्या शिष्टमंडळाने गुरुवारी मुख्याधिकारी गोरे यांची भेट घेतली. फोरमचे अध्यक्ष नितिन परब, ॲड. मनोजकुमार शिंदे, निमंत्रक आप्पा देशमुख, उस्मानभाई रोहेकर, महेश सरदार, राजेश काफरे, प्रशांत देशमुख, मिलिंद अष्टीवकर आदींनी यावेळी मुख्याधिकारी गोरे यांच्यासोबत विविध विषयांवर चर्चा केली व मागण्यांचे निवेदन दिले.

येत्या तीन–चार दिवसात शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होईल, अशी माहिती मुख्याधिकारी गोरे यांनी यावेळी दिली.

# अलिबागच्या कुलाबा किल्ल्यातही अनधिकृत मदार

**अलिबाग : प्रतिनिधी**

किल्ले रायगडावर अनधिकृतपणे तयार करण्यात आलेले मदार मोर्चा प्रकरण ताजे असतानाच अलिबाग समुद्रातील कुलाबा किल्ला येथेदेखील अज्ञात व्यक्तींनी अनधिकृत मदार बांधली आहे. ही अनधिकृत मदार त्वरित हटवावी अशी मागणी सरखेल कान्होजी आंग्रे यांचे नववे वंशज रघुजीराजे आंग्रे यांनी पुरातत्त्व विभागाकडे केली आहे.

किल्ले रायगड मदार मोर्चा प्रकरणाबाबत छत्रपती संभाजीराजे यांनी पुरातत्त्व विभागाला पत्र दिल्यानंतर त्वरित तेथील रंगरंगोटी हटवून ठिकाण पूर्ववत करण्यात आले. तसेच सुरक्षा रक्षकही तैनात केले आहेत. हे प्रकरण ताजे असतानाच कुलाबा किल्ल्यातील तोफांच्या परिसरात मदारचे काम अनधिकृतपणे करण्यात आले आहे. ही मदार पूर्णतः अनधिकृत बांधण्यात आली आहे. हे बांधकाम करताना पुरातत्त्व विभागाचे दुर्लक्ष झाले आहे. किल्ल्यातील इतर कार्यक्रमाच्या वेळी पुरातत्त्व विभाग नेहमीच आक्षेप घेत असतो. पण किल्ल्यात मदार काम केले जात असताना किल्ल्यावरील अधिकारी, कर्मचारी कुठे होते, असा सवाल रघुजीराजे आंग्रे यांनी उपस्थित केला आहे.




**कुलाबा किल्ल्यात एक पुरातन दर्गा आहे, त्याबाबत कोणताही आक्षेप नाही. मात्र आता बांधण्यात आलेली ही मदार पूर्णतः अनधिकृत आहे. इतिहासाच्या पाऊलखुणा पुसून येथील जमीन हस्तगत करण्याचा डाव सुरू आहे. कुलाबा किल्ल्यावरील ही अनधिकृत मदार त्वरित हटवा. दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करा.**
**–रघुजीराजे आंग्रे, अलिबाग**

# माणगावजवळ कळमजे पुलावर अपघात

## दुचाकीस्वार जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा महामार्गावर कळमजे पुलाच्या डाव्या बाजूच्या कठड्याला गुरुवारी (दि. ६) रात्री दुचाकीने धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार जखमी झाला.



माणगाव तालुक्यातील उतेखोल येथील दिनेश लहू कदम (वय ५५) हे इंदापूर बाजूकडून माणगावकडे आपल्या ताब्यातील दुचाकी (एमएच–०४,बीएक्स–३३२९) वरुन येत होते. त्यांची गाडी माणगाव जवळील कळमजे पुलाच्या डाव्या बाजूच्या कटड्याला घासून अपघात झाला. त्यात दिनेश कदम जखमी झाले. गाडीचेही नुकसान झाले.

या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, अधिक तपास पोलीस हवालदार रावसाहेब कोळेकर करीत आहेत.

# कर्जत तालुक्यातील तिघे हद्दपार

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील सुफीयान इकबाल आढाळ (वय २९, रा. दामत), संतोष बबन भुसारी (रा. वरई) आणि हुसेन आरिफ नजे (वय २९, रा. दामत) यांच्या विरुद्ध कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असून त्यामध्ये न्यायालयाने त्यांना शिक्षा ठोठावली आहे. त्यामुळे त्यांना रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने हद्दपार केले आहे.

सुफीयान आढाळ, संतोष भुसारी आणि हुसेन नजे यांच्या बेकायदेशीर कृत्यामुळे कर्जत परिसरात भय आणि दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे कर्जत पोलीस निरीक्षकांनी त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५७ अन्वये कारवाई व्हावी म्हणून पोलीस अधीक्षकांकडे प्रस्ताव सादर केला होता.

# इंटरनेटच्या माध्यमातून होणारी फसवणूक टाळण्यासाठी जागृत राहा –पोलीस निरीक्षक शिरीष पवार

(छाया : विनायक माडपे)



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

इंटरनेटच्या माध्यमातून होणारी फसवणूक टाळण्यासाठी मोबाइल तंत्रज्ञानाच्या भानगडीत पडू नका, जागृत रहा तरच, सायबर गुन्हे आटोक्यात येतील, असे प्रतिपादन खोपोली पोलीस ठाण्याचे निरीक्षक शिरीष पवार यांनी केले.

खोपोली पोलीस ठाण्याच्या माध्यमातून २ जानेवारीपासून रेझींग डे सप्ताह सुरू असून, त्याचाच एक भाग म्हणून शिक्षकांना सायबर गुन्ह्यांबाबत माहिती देण्यासाठी जनता विद्यालयाच्या रामशेठ ठाकूर सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात पोलीस निरीक्षक शिरीष पवार मार्गदर्शन करीत होते. सायबर गुन्हेगारीविषयी पवार यांनी यावेळी माहिती दिली.

अनोळखी माणसाला ओटीपी नंबर देवू नका, कोणताही मेसेज खात्री केल्याशिवाय फॉरवर्ड करू नका, असा सल्ला पवार यांनी दिला. यावेळी इंटरनेटच्या माध्यमातून कसे फसविले जाते, यासंदर्भातील चित्रफीत दाखविण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देशमुखसर यांनी केले. केटीएसपी मंडळाचे कार्यवाह किशोर पाटील, सदस्य दिलीप पोरवाल, केएमसी महाविद्यालयाचे अध्यक्ष राजू अभाणी, जनता विद्यालयाचे अध्यक्ष दिनेश गुरव, शेतकरी संघटनेचे शांताराम पाटील, जनता विद्यालयाच्या मुख्याध्यापिका दिशा राणे यांच्यासह सर्व शाळांचे शिक्षक, शिक्षिका या वेळी उपस्थित होत्या.

# रेवदंड्यात भावाचा भावावर तलवारीने हल्ला

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मोठा भाऊ व आईचे भांडण सोडवून आईला घरात नेल्याचा राग मनात धरून मोठ्या भावाने लहान भावावर तलवारीने हल्ला केल्याची घटना गुरुवारी (दि. ६) रात्री रेवदंड्यात घडली. या घटनेत लहान भावाला किरकोळ दुखापत झाली. या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात मोठ्या भावावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रेवदंडा मोठे बंदर येथे दोन सख्खे भाऊ कुटूंबियांसह शेजारी शेजारी रहात असून त्यांच्यासोबत आईसुध्दा आहे. गुरूवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास मोठा भाऊ व आई यांचे भांडण सुरू होते, यावेळी लहान भावाने आईला तेथून घरात नेले, या गोष्टीचा राग येऊन मोठ्या भावाने लहान भावावर तलवारीने हल्ला केला.

याबाबत लहान भावाने दिलेल्या फिर्यादीनुसार मोठ्या भावावर रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सहाय्यक फौजदार व्ही. के. सरके करीत आहेत.




# पत्रकार हे समाजाचा आरसा आहेत –मुख्याधिकारी पंकज भुसे

## मुरूड नगर परिषदेतर्फे पत्रकारांचा सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

आपल्या लेखणीच्या माध्यमातून समस्यांचे निराकरण व्हावे, यासाठी पत्रकार नेहमीच प्रयत्नशील असतात. त्यांचा समाजाच्या सर्व स्थरांकडून उचित सन्मान राखला जावा, अशी अपेक्षा मुरुड नगर परिषदेचे प्रशासक व मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी गुरुवारी येथे व्यक्त केली.

पत्रकार दिनानिमित्ताने मुरूड नगर परिषदेने येथील पत्रकारांचा गुरुवारी सत्कार केला. नगर परिषदेच्या कै. नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात मुख्याधिकारी भुसे बोलत होते. पत्रकार हे समाजाचा आरसा आहेत, असे ते म्हणाले.

(छाया : संजय करडे)



कार्यक्रमाचे प्रास्ताविक नरेंद्र नांदगावकर यांनी केले. येथील पत्रकार आपल्या लेखनातून मुरूडचं नावलौकिक वाढवित आहेत. त्यांचे योगदान कधीही न विसरले जाणारे आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी पत्रकार संजय करडे, सिराज शेख, सुधीर नाझरे, नितिन शेडगे, गणेश चोडणेकर, प्रकाश सद्रे यांना मुख्याधिकारी भुसे व प्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण यांच्या हस्ते गुलाबपुष्प, प्रशस्तीपत्र व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष संजय करडे यांनी सत्काराला उत्तर दिले. प्रशांत दिवेकर, नंदकुमार आंबेतकर, संजय वेटोळी, नगर परिषदेचे लेखापाल कपिल वेहेले, मनोज पुलेकर, साहिल मुजावर, सतेज निमकर, सुदेश माळी व कर्मचारी उपस्थित होते.

# सैन्यदलात भरती झालेल्या बाबू नाईकचे कर्जतमध्ये उत्स्फूर्त स्वागत

**कर्जत : प्रतिनिधी**

नगर परिषद हद्दीतील दहिवली संजयनगरमधील बाबू प्रेमानंद नाईक हा युवक भारतीय सैन्यदलात भरती झाला आहे. नाशिक येथील ट्रेनिंग संपवून तो कर्जतमध्ये आला. त्याचे कर्जतकरांनी उत्स्फूर्त स्वागत केले.

मूळ कर्नाटक राज्यातील बाबू गेल्या २० वर्षांपासून कर्जतमध्ये वास्तव्यास आहे. बाबूला सर्वजण लखन या नावाने ओळखतात. बाबूचे दहावीपर्यंतचे शिक्षण स्वातंत्रसैनिक दत्तात्रेय डोंबे विद्या निकेतनमध्ये झाले तर वाणिज्य शाखेतील बारावीपर्यंतचे शिक्षण अभिनव ज्ञान मंदिर कनिष्ठ महाविद्यालयात झाले. बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर बाबू सातारा येथील कमांडो अकादमीत सैनिकी शिक्षणासाठी दाखल झाला. सहा महिन्यांचे शिक्षण झाल्यावर तो मुंबईत येऊन सैन्यदलात भरती झाला. त्यांनतर त्याला ट्रेनिंगसाठी नाशिक येथील आर्टिलरी सेंटर (तोफखाना विभाग) मध्ये पाठविण्यात आले. तेथील खडतर ट्रेनिंग पूर्ण झाल्यानंतर त्याची नियुक्ती पंजाबमधील पटीयाला येथे झाली. तो आपल्या घरी आला, तेव्हा कर्जतकरांनी त्याचे उत्स्फूर्त स्वागत केले.

(छाया : विजय मांडे)



